पुढारी

# सुराभिनयाने, अभिनयाने नटलेलं 'नक्षत्राचे देणं मत्स्यगंधा'



**संगीत नाटकात अभिनय हा सहसा पाहण्यास मिळत नाही. फक्त गाजलेल्या नाट्यगीतांवरच संतुष्ट व्हावे लागते. पण या नव्याने आलेल्या मत्स्यगंधेचे तसे नाही. पराशरच्या भूमिकेतील नचिकेत लेले आणि सत्यवतीच्या भूमिकेतील केतकी चैतन्य यांच्या सुराभिनायाला दादही देणे उचित ठरेल. त्या दोघांचे हे पहिलंच नाटक असून कुठंही नवखेपणाचं लवलेश दिसला नाही. त्यांच्या आवाजातील दर्दपणा स्पर्शून जाणारा असाच आहे.**

संगीत रंगभूमीवर सुवर्णकाळ असताना जी नाटके आली ती लोकप्रियतेच्या शिखरावर विराजमान झाली. म्हणूनच सौभद्र , स्वयंवर, मानापमान, संशयकल्लोळ, एकच प्याला अशा नाटकांचे प्रयोग आजही होताना दिसतात. त्यानंतर दोन तीन नाटककारांनी गद्य रंगभूमी समृद्ध केली. त्यांनीसुद्धा संगीत नाटकं लिहून संगीत रंगभूमीला संजीवनी दिली. त्यात वसंत कानेटकर आणि वि.वा.शिरवाडकर या नाटककारांचा उल्लेख करावाच लागेल. कानेटकरांचे मत्स्यगंधा आणि लेकुरे उदंड झाली आणि शिरवाडकरांचे ययाती आणि देवयानी ही नाटके त्याकाळी गाजली आणि त्यास सुद्धा प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळाला. सध्याच्या मंदीच्या दिवसात अशा नाटकांची निर्मिती करणं म्हणजे धाडसच. धी गोवा हिंदू असोसिएशन या संस्थेने १९६४ साली मत्स्यगंधा या नाटकाची निर्मिती केली होती. आज पुन्हा त्याची निर्मिती करताना आजच्या तरुण पिढीला मत्स्यगंधा या नाटकाचा परिचय व्हावा ही भावना निर्मात्यांची असावी. नाटकाच्या प्रयोगास त्या काळातीलच प्रेक्षक पाहिले. ते मनमुराद नव्याने आलेल्या नाटकाला आणि कलाकारांना टाळ्यांचा प्रतिसाद देताना बरं वाटलं. पण तरुण पिढीची या नाटकाला असलेली १० टक्केच उपस्थिती खटकली.

तिसरी घंटा होते. पडदा सरकतो. विशाल गंगामातेचं दर्शन होत. व्यासांचे दर्शन होते. धीरगंभीर आवाजात व्यासांचे बोलणं नाट्यगृहात घुमू लागत. ते म्हणतात, मला गंगामातेने एक प्रश्न विचारला आहे, तिच्याच लाडक्या सुपुत्राबद्दल. युवराज देवव्रताबद्दल. हस्तिनापूरच्या या वारसाबद्दल. ती म्हणते माझ्या पुत्राने माझा प्रचंड प्रवाह शोधण्याचं सामर्थ्य दर्शविले त्या माझ्या पुत्राला स्वत:चा चांगुलपणा शोधण्याचं सामर्थ्य का नाही दिलंस? तिच्या या उग्र प्रश्नाला मी शांत करणार आहे, तिच्याच सुपुत्राची कथा सांगून. पण या कथेला सुरुवात करणार आहे सत्यवती म त्स्यगंधेपासून. नाटकास प्रारंभ होतो. त्याच्यात आपण गढून जातो.

मत्स्यगंधा नाटक पाहताना वसंतराव कानेटकरांचे संवाद प्रहार करीत होते. त्यांच्या संवादातील धार क्षणोक्षणी जाणवत होती. असा नाटककार पुन्हा होणे नाही याची प्रचिती सदोदित येत होती. त्यांची नाट्यपदं म्हणजे कवीच्या शब्दाचा फुलोरा होता. त्या शब्दांना पंडित जितेंद्र अभिषेकी यांनी दिलेला संगीत साज म्हणजे एक प्रकारचं नक्षत्राचं देणंच. देवाघरचे ज्ञात कुणाला, गुंतता हृदय हे, साद देती हिमशिखरे, नको विसरू संकेत मिलनाचा, तव भास अंतरा झाला मनमोहना रे, गर्द सभोवती रान पाखरे तू तर चाफेकळी, अर्थशून्य भासे मज हा कलह जीवनाचा ही नाट्यपदं या नाटकाची असेट आहेत. रामदास कामत आणि आशालता वाबगावकर यांनी ती गाऊन अजरामर केली आहेत. याचे मूर्तिमंत दर्शन या नव्याने आलेल्या प्रयोगात प्रामुख्याने मिळतं हे विशेष.आज ती पद नचिकेत लेले आणि केतकी चैतन्य या गायक-गायिकेच्या आवाजात ऐकताना ते आपणास त्या भावविश्वात घेऊन जातात.

संपदा कुळकर्णी या दिग्दर्शिकेने हे नाटक करण्याआधी सगळ्या बाबींचा विचार केलेला दिसला. खरं तर हे नाटक तीन अंकाचे. पण तिनं त्याचे दोन अंकात संकलन करून प्रभावी प्रयोग सादर केला आहे. प्रत्येक व्यक्तिरेखेस दिलेला आकृतिबंध आणि त्यास दिलेली नृत्याची झालर प्रवेशास उत्कर्षबिंदूपर्यंत नेणारी अशीच आहे. राहुल मेहंदळे यांचा भीष्म नाटकाच्या यशातील महत्त्वाचा दुवा आहे. त्यांची संवाद बोलण्याची ढब, मुद्राभिनय आणि भीष्मरूपी व्यक्तिरेखा याचा तिहेरी संगम त्यांनी घडवून आणला आहे. पूजा राईबागी फक्त उत्तरार्धात दिसल्या असल्या तरी त्या स्वत:चे अस्तित्व सिद्ध करतात. संजीव तांडेल धीवर, शशी गंगावणे, अमोल कुलकर्णी चंडोल यांनी त्या त्या भूमिकेत आपली छाप पडली आहे.

■ संजय कुळकर्णी